भारतीय रिज़र्व बैंक
# RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/२०१०-११ - ११/२७२
डीबीओडी.एलईजी.बीसी.६१/०१.०७.००५/२०१०-११ नोव्हेंबर १२, २०१०

सर्व अनुसूचित वाणिज्य बँका/अखिल भारतीय वित्त संस्था
(आरआरबी सोडून)

महोदय,

**धनकोंसाठी उचित व्यवहार संहितेवरील मार्गदर्शक तत्वे -**
**प्रक्रिया शुल्के/आकार ह्याबाबत सर्व माहिती प्रकट करण्याबाबत**

कृपया वरील विषयावरील आमचे परिपत्रक, डीबीओडी. क्र. एलईजी.बीसी. ८६/०९.०७.००५/२००८-०९ दि. नोव्हेंबर २५, २००८ चा संदर्भ घ्यावा. त्यात बँकांना सांगण्यात आले होते की. त्यांनी कर्जासाठी असलेल्या फॉर्ममध्येच, प्रक्रियेसाठी लागणारी शुल्के/आकार ह्याबाबतची सर्व माहिती न चुकता प्रदर्शित करावी तसेच, वित्तपुरवठ्याच्या इतर स्त्रोतांबरोबर तुलना करण्यासाठी ग्राहकांना मदत व्हावी ह्यासाठी ग्राहकांना संपूर्ण खर्चाबाबत कळवावे.
२) प्रामाणिकपणा व पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने, बँकांना सांगण्यात येत आहे की, त्यांनी, कर्जाच्या अर्जावर प्रक्रिया करण्यासाठी लागणारी शुल्के/आकार ह्याबाबतची सर्व माहिती, कर्जाची रक्कम मंजुर न झाल्यास परत केली जाणारी रक्कम, पूर्व प्रदानाचे पर्याय व असल्यास आकार, विलंबाने प्रदान केल्यास द्यावयाची दंडात्मक रक्कम स्थिर दरातून तरत्या व्याजदरात कर्जाचे रुपांतरण करतेवेळी लागणारे रुपांतरण आकार, किंवा त्या उलट, इंटरेस्ट रिसेट क्लॉजचे अस्तित्व, किंवा कर्जदाराच्या हितावर परिणाम करणारी कोणतीही बाब, ह्याबाबतची संपूर्ण माहिती ग्राहकाला पारदर्शकतेने द्यावी.
३) दुसऱ्या शब्दात, ग्राहकाला वित्तपुरवठ्याच्या अन्य स्त्रोंतांबरोबर तुलना करण्यास मदत व्हावी ह्यासाठी, बँकांनी, **कर्जाच्या अर्जावर प्रक्रिया/मंजुरी करण्यासाठी लागणाऱ्या सर्व आकारांसह असलेला संपूर्ण खर्च पारदर्शकतेने उघड करावा.** तसेच खात्री करुन घेण्यात यावी असे आकार/शुल्के ही भेदभाव न करता लावली जावीत.

आपला.
(पी आर रवि मोहन)
मुख्य महाव्यवस्थापक

---

बँकिंग ऑपरेशन्स अँड डेवलपमेंट विभाग, केंद्रीय कार्यालय, १२ वा मजला, केंद्रीय कार्यालय इमारत, शहीद भगतसिंह मार्ग, मुंबई ४००००१, ई-मेल - **cgmicdbodco@rbi.org.in.**